महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार








छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : ९१ वे | दिनांक : २५/०३/२०२६ | वार : बुधवार


## उद्धव ठाकरेंचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांना 'शायराना' सवाल



**मुंबई :** "राजकारण हा माझा पिंड नाही, माझा मूळ स्वभाव हा कलाकाराचाच आहे. मुख्यमंत्री महोदय, तुम्ही माझे इतके उत्तम वर्णन केले, मला इतके जवळून ओळखले, मग 'ऐसी कौनसी बात थी, की और किसी का हाथ पकडना पडा'," अशा शब्दांत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शायरीला 'शायरी'नेच उत्तर दिले. विधान परिषदेतील 9 सदस्यांचा कार्यकाळ संपत असल्याच्या पार्श्वभूमीवर आयोजित निरोप समारंभात उद्धव ठाकरे यांची फटकेबाजी आणि राजकीय टोलेबाजी पाहायला मिळाली.

आपल्या मुख्यमंत्रीपदाच्या काळातील आठवणींना उजाळा देताना उद्धव ठाकरे म्हणाले, उद्धव ठाकरे म्हणाले, मी या विधीमंडळात मुख्यमंत्री म्हणून आलो होतो. काही गोष्टी आयुष्यात अशा घडतात की आपल्या ध्यानीमनी नसते आणि अचानक ती जबाबदारी येते. जबाबदारी आल्यानंतर त्यातून पळ काढणे हे मर्दाचे लक्षण नसते. त्यामुळे ती जबाबदारी स्वीकारली. मला सगळ्यांना धन्यवाद द्यायचे आहेत. सर्व माझे त्यावेळचे आजी-माजी सहकारी, मंत्रिमंडळात होते. सगळे शासकीय अधिकारी, सर्व प्रशासन, सर्व अधिकाऱ्यांपासून कर्मचाऱ्यांना मी मनापासून धन्यवाद देतो. कारण एक प्रशासनाचा गंधही नसणारा माणूस अचानक राज्याच्या मुख्यमंत्री पदावर बसतो आणि तो राज्य चालवतोय. हे या सगळ्यांच्या सहकार्याशिवाय शक्य झाले नसते.

उद्धव ठाकरे म्हणाले, मुख्यमंत्री महोदय आपण मला निरोप देण्यासाठी स्वत: अगत्याने हजर राहिलात, त्याबद्दल मनापासून धन्यवाद. मला तो ही दिवस आठवला आणि त्या दिवसाची आठवण मी तुम्हाला करून देणार आहे. पण काल विधिमंडळात जे काही घडले ते बघून मला तो दिवस का आठवला ते सांगतो. कारण आपण म्हणाला होतात ज्ञानेश्वरांचे भारूड. काट्याच्या आणीवर वसली तीन गावे, दोन ओसाड एक वसई चिना, आता त्या गावची पाटीलकी आपल्याकडे आहे. आता ते आणीवरच्या तीन गावांमधील एक गाव आणीवर गेलेले आहे. बाकी गावांचे काय झाले? ते त्या गावकऱ्यांना माहिती आहे.

उद्धव ठाकरे म्हणाले, ज्ञानेश्वरांची आठवण आल्यानंतर एक गोष्ट आवर्जुन सांगावी वाटते की, ज्ञानेश्वर महाराज 12 व्या, 13 व्या शतकात होऊन गेलेले आहेत. त्यावेळेला ज्ञानेश्वरांनी रेड्याकडून वेद वदवून घेतले होते. त्या शतकापासून या शतकात आल्यानंतर स्वार्थासाठी रेडे कापले जातात. हा महाराष्ट्र कोणत्या दिशेने चाललेला आहे? आपले खालच्या सभागृहातील निवेदन मी काळजीपूर्वक ऐकले. नाशिकच्या प्रकरणाबाबत आपण जी भूमिका घेतली, त्यासाठी धन्यवाद देतो.

उद्धव ठाकरे म्हणाले, सिनेकलावंत अतुल कुलकर्णी यांचे एक चांगले वक्तव्य आहे. पकडले जातात ते भोंदू, पण जे पकडले जात नाहीत त्या महाराजांचे काय करायचे? आपण सगळ्यांनी एकत्र मिळून एक भूमिका घ्यायला पाहिजे. सगळ्या राजकारणींनी ठरवले, तर बुवा शक्ती पेक्ष युवाशक्तीला आपण जास्त ताकद दिली पाहिजे. या देशात बुवा चमत्कार करू शकत नाही, युवा चमत्कार करू शकतात. युवाशक्तीला नीट पाठिंबा दिला, तर या बुवांची दुकाने बंद झाल्याशिवाय राहणार नाही.

उद्धव ठाकरे म्हणाले, मुख्यमंत्रिपदानंतर मंत्रालयात प्रवेश केला होता, तो दिवस आठवतो. सर्वांच्या चेहऱ्यांवर आनंद होता. तो क्षण विसरु शकत नाही. मी वर्षा सोडून बाहेर पडलो तेव्हा हेलावलेला महाराष्ट्र बघून मी गहिवरुन गेलो होतो. हे सगळं प्रेम महाराष्ट्राने दिले, असे प्रेम थोड्या लोकांच्या नशिबात येते. वर्षा सोडून मातोश्रीत आलो, मुख्यमंत्रिपद सोडलेले नव्हते. मातोश्रीत बसून कारभार करत होतो, मंत्री घरी येत होते. त्यांना घरी बसूनच पदे दिली होती. त्यावेळी अधिकाऱ्याने विचारले मुख्यमंत्रिपदाची शपथ घेताना होतात तसेच आता आहात कसे काय? मी म्हटले जे आपले नसते, ते स्वीकारण्यात आनंदीत होण्याची गरज नसते आणि जे आपले नसते ते सोडण्यात दु:खी होण्याची काय गरज. मुख्यमंत्री पद जसे अचानक आले, तसे ते अचानक गेले. मी माझ्या घरी आलो. आपले घर आणि त्या घरातील आनंद हा मला वाटते सगळ्यांसाठी महत्त्वाचा असतो.

## 'निलंबन करण्याचा अधिकार सभापतींचा नाही' : मुख्यमंत्री



**मुंबई :** विधानपरिषद सभागृहात संविधानातील अधिकारांच्या वाटणीवर भाष्य करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उपसभापती नीलम गोऱ्हे यांच्या भूमिकेवर स्पष्ट शब्दांत आक्षेप नोंदवला. मंत्रिमंडळ, विधानसभा आणि विधानपरिषद या तिन्ही स्तंभांचे अधिकार संविधानाने निश्चित केलेले असून, सभागृहाच्या अध्यक्षांचा किंवा सभापतींचा सन्मान राखणे आणि त्यांचे निर्देश पाळणे हे सर्वांचे कर्तव्य असले, तरी 'एक्झिक्युटिव्ह' (कार्यकारी मंडळ) च्या प्रशासकीय निर्णयांमध्ये हस्तक्षेप करण्याचा किंवा त्यात ढवळाढवळ करण्याचा अधिकार पीठासीन अधिकाऱ्यांना नाही, असे त्यांनी ठामपणे म्हटले आहे.

हा संपूर्ण वाद सातारा जिल्हा परिषद अध्यक्ष निवडीवरून झालेल्या चर्चेनंतर सुरू झाला, ज्यामध्ये उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी साताऱ्याचे पोलिस अधीक्षक तुषार दोशी यांच्या निलंबनाचे थेट निर्देश दिले होते. यावर प्रत्युत्तर देताना मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले की, एखाद्या अधिकाऱ्याचे निलंबन करणे हा पूर्णपणे प्रशासकीय अधिकार असून तो सरकारच्या अखत्यारीत येतो. त्यामुळे अशा निर्णयांमध्ये सभापतींनी हस्तक्षेप करू नये, असे म्हणत त्यांनी एकप्रकारे उपसभापतींचे कान टोचले आहेत.

विधानपरिषदेत सभापती नीलम गोऱ्हे यांनी सातारा जिल्ह्याचे पोलिस अधीक्षक तुषार दोशी यांच्या निलंबनाचे निर्देश दिले होते. यावरून शिवसेना ठाकरे गटाचे आमदार अनिल परब यांनी प्रश्न उपस्थित केला होता. यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उत्तर दिले आहे.

देवेंद्र फडणवीस म्हणाले, खाली विषय झाला की अधिकारी मंत्र्यांच्या ब्रिफींगला आलेला नाही, अशा स्थितीत एखादा दिलेला निर्देश हा सभागृहाचा निर्देश असतो. एखादा मंत्री बोलतो की निलंबित करेन तेव्हा त्याला तो अधिकार आहे. सभापती यांनी दिलेला निर्देश असतो. वस्तुस्थिती असेल तर एक्झिक्युटीव्हकडून कारवाई होते, पण वस्तुस्थिती वेगळी असेल तर बदलही करू शकतो. आश्वासन पाळता येत नसेल तर हे सभागृहाला सांगावे लागते, जे एक्झिक्युटीव्हचे अधिकार आहेत ते त्यांचे अधिकार आहेत. त्या स्थानावर असताना तालिका सभापती परिस्थिती बघून निर्देश देऊ शकतात, पण ते ब्राम्हवाक्य नाही, असे फडणवीस यांनी स्पष्ट केले आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २५ मार्च २०२६


## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते परभणी जि.प. अध्यक्षा वाकळे यांचा सत्कार



**जिंतूर (बि.डी.रामपूरकर) :** परभणी जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने ऐतिहासिक यश संपादन करत सत्ता स्थापन केली आहे राज्यमंत्री तथा पालकमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर यांच्या नेतृत्वाखाली मिळालेल्या या यशाची दखल घेत मा मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी जिल्हा परिषद अध्यक्षा लताताई विजय वाकळे यांचा विधान भवन मुंबई येथे सत्कार करून गौरव केला.परभणी जिल्ह्याच्या राजकीय इतिहासात प्रथमच भाजपने जिल्हा परिषद भारतीय जनता पक्षाच्या ताब्यात दिली आहे तसेच परभणी जिल्ह्यातील सर्वच नगरपालिका तसेच पंचायत समित्यांमध्ये घवघवीत यशाबद्दल भाजपा चा झेंडा फडकावला आहे जिल्हा परिषद निवडणुकीत भाजपचे तब्बल २४ सदस्य विजयी झाले आणि महा युवतीची सत्ता आली आहे आणि यामध्ये लताताई विजय वाकळे यांची जि.प. अध्यक्षपदी आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस (अजित पवार) गटाचे श्रीकांत भोसले विटेकर यांची उपाध्यक्ष पदावर बिनविरोध निवड झाली.या पार्श्वभूमीवर महाराष्ट्राचे मा मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी अध्यक्षा यांचे अभिनंदन करत पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या.यावेळी त्यांनी जिल्हा परिषदेमार्फत ग्रामीण भागातील विकासकामांना गती देण्याचे आवाहन केले. विशेषतः पायाभूत सुविधा, शिक्षण, आरोग्य आणि नागरिकांच्या मूलभूत गरजांच्या पूर्ततेसाठी प्रभावी नियोजन करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. राज्य सरकारकडून आवश्यक ते सर्वतोपरी सहकार्य मिळेल, असेही त्यांनी स्पष्ट केले.या प्रसंगी भाजप जेष्ठ नेते तथा माजी आमदार रामप्रसाद बोर्डीकर, जिल्हाध्यक्ष सुरेश भुमरे,गट नेते दिलीपराव देशमुख,सुनिल भोंबे पाटील,सुमेध सूर्यवंशी,संजय वाकळे उपस्थित होते.

## बोगस कामगार प्रकरणाची चौकशी करून दोषींवर कारवाई करणार मंत्री आकाश फुंडकर

**बीड (भगवंत पाळवदे) :** कामगार विभागाने राज्यभरात दक्षता पथकांच्या माध्यमातून ४६ ठिकाणी गुन्हे दाखल केले आहेत, बीड प्रकरणातही स्वतंत्र अधिकाऱ्यामार्फत सखोल चौकशी करण्यात येईल. तसेच, उपलब्ध पुरावे सादर करण्याचे आवाहन करत, दोषींवर शंभर टक्के कारवाई करण्यात येईल, अशी ग्वाही मंत्री ॲड आकाश फुंडकर यांनी विधानसभेत दिली.बीड जिल्ह्यात बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळांतर्गत मार्च २०२० ते फेब्रुवारी २०२६ दरम्यान बोगस मृत कामगार दाखवून कोट्यवधींचा अपहार झाल्याच्या आरोपाबाबत विधानसभेत सदस्य सुरेश धस यांनी लक्षवेधी सूचना मांडली.उत्तर देताना कामगार मंत्री ॲड. फुंडकर यांनी सांगितले की, राज्यात काही ठिकाणी बोगस एजंटांकडून बनावट कागदपत्रे आणि खोटे सही-शिक्के तयार करून शासनाच्या योजनांचा गैरफायदा घेतला जात असल्याचेही त्यांनी नमूद केले. अशा प्रकारांना कोणतीही सहानुभूती दाखवली जाणार नसून दोषी अधिकारी, संबंधित संस्था किंवा इतर कुणीही असले तरी त्यांच्यावर कठोर कारवाई केली जाईल.पूर्वी कामगार नोंदणी प्रक्रिया ऑफलाइन असल्यामुळे अशा गैरप्रकारांना वाव होता. ही त्रुटी दूर करण्यासाठी नोंदणी प्रक्रिया पूर्णपणे ऑनलाइन करण्यात आली असून त्यात बायोमेट्रिक प्रणालीचा समावेश करण्यात आला आहे, ज्यामुळे फसवणूक रोखण्यास मदत होणार आहे.मंत्री फुंडकर यांनी सांगितले की, २०२० ते २०२६ या कालावधीत बीड जिल्ह्यात ११५ अर्ज प्राप्त झाले होते. त्यापैकी एक अपघाती मृत्यूचा अर्ज खरा आढळला असून उर्वरित ११४ अर्जांची तपासणी सुरू आहे. आतापर्यंत ५३ प्रकरणांमध्ये अनियमितता आढळलेली नाही, तर उर्वरित प्रकरणांची पडताळणी सुरू आहे.

## दौलताबाद परिसरात शिव-पार्वती यात्रा संपन्न : काटेरी फास विधीत भाविकांची भक्तीभावाने उड्या







**दौलताबाद (जावेद अहमद) :** दि 24/03/2026काटेरी फास नवसाची पूर्तता सतरा भाविकांचा श्रद्धेचा सोहळा पार पडलाअब्दीमंडी येथे शिव पार्वती यात्रा उसत्व संपन्न भगवान वराहदेवता मंदिराच्या आवारात शिव पार्वती यात्रेचे यंदा प्रथमच वर्षी भव्य आयोजन करण्यात आलेदि 19 रोजी विधिवत पूजन करून काठी उभी करण्यात आली,संध्याकाळी शिव पार्वतीस अबील नवेद्य देण्यात आलेदि 23 सोमवारी बाल ब्रह्मचारी स्वामी सोमेश्वरा नंदगिरी यांचे प्रवचन झालेरात्री उशिरापर्यंत माळीवाडा,अब्दीमंडी,दौलताबाद, वंजारवाडी,वरझडी,पेकळवाडी, पोटूल, वडाचीवाडी,पळशी,पाचपीर वाडी येथील भजनी मंडळांनी भजने गाऊन भाविकांना मंत्रमुग्ध केले होतेरात्री अकरा वाजता फटाक्यांची आतिषबाजी करत दोन वाजेपर्यंत शिव पार्वती काठीची भव्य मिरवणूक हर हर महादेव गजर घोषणात गणपती मंदिर पर्यंत काढण्यात आलीयानंतर काटेरी फास नवसाची विधी झाला बाभळीच्या काटचे फास उभारून त्यावरसोमनाथ दामू मुळे,भानुदास दगडू धनाईत,दत्तू विनायकराव पल्लाळ,दिलीप काळे, दादाराव कोल्हाळ, संजू वावरे,गोरख रघुनाथ हेगडे,रवी वावरे,प्रदीप पल्हाळ,किशोर जाधवदादाराव पल्हाळ,शामराव पल्हाळ,साईनाथ पल्हाळ,राम महाराज विटोरे,अनिल वैष्णव,ईश्वर महाराज,साईनाथ महाराज हिवाळे या सतरा भाविकांनी श्रद्धेने उड्या मारत नवस पूर्ण केलेपहाटे चार वाजता फास जाळून यात्रेची सांगता करण्यात आली या यात्रेचे आयोजन भानुदास धनाईत यांनी केले होते

## श्रीराम जन्मोत्सव समिती अध्यक्षपदी ईश्वर पाटील, उपाध्यक्षपदी विनोद गजलेश्वर



**कन्नड (अरुण थोरात) :** दि. २२ मार्च रोजी स्वराज रक्षक युवा संघाची बैठक झाली त्या बैठकी मध्ये संघटनेच्या सर्व पदाधिकार्यांनी व स्वराज रक्षक संघाचे संस्थापक अध्यक्ष नितिन राठोड यांच्या उपस्थितीत ईश्वर पाटील यांची श्रीराम जन्मोत्सव समितीच्या अध्यक्षपदी तर विनोद गजलेश्वर यांची उपाध्यक्षपदी बिनविरोध निवड झाली व तसेच दोघांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. दि.२६ मार्च रोजी श्रीराम जन्मोत्सव मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात येणार आहे. सकाळी १० वाजता भारुका नगर, गिरणी ग्राउंड येथे श्रीराम प्रतिमा पुजन होणार असून संध्याकाळी ०५:३० वाजता तेथून भव्य शोभा यात्रा निघणार आहे. या शोभायात्रेत तालुकयातील व शहरातील सर्व श्रीराम भक्तांनी सामील व्हावे असे आवाहन स्वराज्य रक्षक संघाचे अध्यक्ष नितीन राठोड, उत्सव समीतिचे अध्यक्ष ईश्वर पाटील, उपाध्यक्ष विनोद गजलेश्वर यांच्या सह संजय पंडीत, अनिल सिरसाठ, अनिल खंबाट, कैलाश जाधव, रमेश शिंदे, श्रीकुष्ण बडग, प्रमोद ढोले, दिपक डोळस, उमेश राठोड, जयेश देशमुख, निशांत चव्हाण, वैभव देशमुख, ओम गोरे, शुभम यांनी केले आहे.


**बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002**

**महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.**
**कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.**
**संपर्क क्र. 7588005002**

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २५ मार्च २०२६


## शेवंती

अंगणातील परसबागेत
शेवंती छान फुलते
हवेची झुळूक येता
हिरव्या पानात डुलते

पाच पाकळ्यांच्या शेवंतीला
आकर्षक दिसे रंग
सुंदर रूप पाहून
मन होई दंग

पिवळी, पांढरी, गुलाबी
रूप दिसे झुपकेदार
दरवळणारा गंध
सर्वांना आवडे फार

हिवाळ्यात बहर येतो
शेवंतीच्या फुलाला
प्रसन्नतेनं वाहू
भक्तीभावाने देवाला

झुपकेदार पाकळ्या
मन वेधून घेती
उन पावसात राहूनी
आपणास आनंद देती



**- रवींद्र चालीकवार**
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६

## सावली हरवलेल्या दिवसात

काळ रुसत चालला
क्षणाक्षणाला
या सावली हरवलेल्या दिवसात..

आता उदासलं जीणं
अन् हरवलं जीवनगाणं
चाकोरी सोडून भरकटतोय रानवारा
उन्हाचा कहर वाढल्याने..

आता गोड आठवणी
बोचत आहे काळजात
या काळीज नसलेल्या जगात
संवेदना जिवंत असल्याने..

शिवाराचा कधीचाच
झालाय पाचोळा
पाखर पडली निपजीत
आपापल्या घरट्यात..

कोणाला कोणाशी
राहिलं नाही देणं घेणं
स्वार्थाचं वाळवंट वाढल्यानं..

आता
जो तो समजू लागला सिकंदर
माती सोडल्याने
मातीत जायचं हे माहीत असूनही..

**- ज्ञानेश्वर गायके,**
**कन्नड**






# राज्यस्तरीय बसवरत्न पुरस्कार साठी प्रस्ताव पाठविण्याचे बसव प्रतिष्ठानचे आवाहन...



**मुरूम (प्रा.सुधीर पंचगल्ले) :** क्रांतिसूर्य जगद्ज्योती महात्मा बसवेश्वर जयंतीनिमित्त प्रतिवर्षी बसव प्रतिष्ठान अखिल भारतीय सामाजिक संघटनेच्या वतीने राज्यातील विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा "राज्यस्तरीय बसवरत्न पुरस्कार" देऊन राज्यातील दिग्गज मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात येते. सन्मानचिन्ह,सन्मानपत्र,शाल,फेटा असे पुरस्कार स्वरूप आहे. जगद्ज्योती महात्मा बसवेश्वर जयंती उत्सव २०२६ निमित्त यंदाचा पुरस्कार सोहळाचे १२ वे वर्ष असून आतापर्यंत राज्यातील २६१ व्यक्तींना संघटनेचा माध्यमातून सन्मानित करण्यात आला आहे. पुरस्काराने सामाजिक कार्याची प्रेरणा मिळावी, उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना ऊर्जा मिळावी ही उदात्त हेतू सामोरे ठेऊन बसव प्रतिष्ठानच्या वतीने धाराशिव जिल्ह्यातील उमरगा तालुक्यातील मुरूम येथे या सोहळ्याचे आयोजन केले जाते, सण २०२६ या वर्षात १९ एप्रिल रोजी म्हणजेच अक्षय तृतीया रोजी जगद्ज्योती महात्मा बसवेश्वर जयंती सोहळा संपन्न होणार आहे, त्यानंतर मे २०२६ महिन्यात "राज्यस्तरीय बसवरत्न पुरस्कार" सोहळा संपन्न होणार असून या सोहळ्यात सामाजिक,राजकीय,शैक्षणिक, पत्रकार,क्रीडा,विधिज्ञ,शेतकरी, उद्योग, व्यापार, सहकार, संगीत, नृत्य,प्रशासकीय यासह विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तीचा सन्मान गौरव सोहळा संपन्न होणार आहे व त्याच बरोबर ०५ व्यक्तींना जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार असून राज्यातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तीने sasmramlingp@gmail.com किंवा www.basavpratishthanrp.com किंवा ७७७४८४९५७२ या व्हाट्सएप नंबर वर दि.०५ मे २०२६ पर्यंत प्रस्ताव पाठविण्याचे आवाहन बसव प्रतिष्ठान अध्यक्ष डॉ.रामलिंग पुराणे यांनी केले आहे.

## शिवना प्रकल्पातील पाण्याची नासाडी, जलसमाधी आंदोलनाचा ईशारा



**कन्नड (अरुण थोरात) :** शिवना मध्यम प्रकल्पातील पाण्याची नासाडी करणाऱ्या अधिकार्यांचे निलंबन करा, शेतकर्यांवर दाखल केलेले गुन्हे मागे घ्या आदी मागण्यासाठी सुरु असलेल्या उपोषणास प्रशासनाकडून प्रतिसाद मिळत नसल्याने, आता उपोषणकर्त्यांनी जलसमाधी आंदोलनाचा ईशारा दिला आहे.याबाबत 'शिवना टाकळी पाणी बचाव संघर्ष समितीने जिल्हाधिकारी छत्रपती संभाजीनगर यांना दि.२४ मार्च रोजी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की,शिवना मध्यम प्रकल्पातील पाण्याची नासाडी करणाऱ्या अधिकार्यांचे निलंबन करुण गुन्हा दाखल करण्या बाबत आपल्या कार्यालयात दि.१३ मार्च रोजी निवेदन देण्यात आले. परंतु दहा दिवस उलटून ही यावर आपल्या व संबंधित कार्यालया कडून कुठलीही कार्यवाही झाली नाही. त्यामुळे आम्ही शेतकरी टाकळी येथे दि.२१ मार्च रोजी उपोषणास बसले आहोत. परंतु कुठलाही अधिकारी उपोषणस्थळी हजर झाले नाही. यावरुन लक्षात येते की, तुम्हाला व इतर अधिकारी यांना शेतकर्यांची कुठलीही तमा नाही. म्हणून दि.२६ मार्च रोजी आम्ही उपोषणकर्ते व शेतकरी शिवना मध्यम प्रकल्पात जलसमाधी आंदोलन करणार असल्याचे संघर्ष समिती चे विजय हार्दे, दादा पवार, शिवराज शेळके, सुनील बोडखे, अक्षय शिरसाठ, संघर्ष बोलधने, रमेश देशमुख यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

# माहेर व पालक मेळावा: विद्यार्थिनींच्या स्वावलंबनासाठी प्रेरणादायी उपक्रम

**छत्रपती संभाजीनगर :** साडेदहा वाजता डॉ. सौ. इंदिराबाई भास्करराव पाठक महिला महाविद्यालयाच्या सभागृहात माहेर व पालक मेळाव्याचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. विद्यार्थिनी, आजी-माजी विद्यार्थिनी आणि त्यांच्या पालकांना विविध क्षेत्रातील करिअरच्या संधींबाबत मार्गदर्शन मिळावे आणि अधिकाधिक विद्यार्थिनी आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी व्हाव्यात, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे.या मेळाव्याचे प्रमुख आकर्षण म्हणजे शिक्षण आणि सामाजिक क्षेत्रातील समृद्ध अनुभव असलेल्या सौ. स्वाती स्मार्त यांचे प्रेरणादायी व्याख्यान. त्यांच्या मार्गदर्शनातून विद्यार्थिनींना करिअरच्या नव्या दिशा आणि संधींची ओळख होणार आहे.महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुनिता बाजपाई तसेच समिती प्रमुख डॉ. पराग चौधरी यांनी सर्व विद्यार्थिनी आणि पालकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे. हा मेळावा विद्यार्थिनींच्या उज्ज्वल भविष्यासाठी आणि स्वावलंबनाकडे वाटचाल घडविणारा एक महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २५ मार्च २०२६


## वेदनेत आधार

वेदनेत आधार झाली माझी प्रिय कविता
तेव्हापासून मी लिहितो रोज एक कविता

आजाराशी संघर्ष करता करता मला
वेदनेतून बाहेर काढली माझी कविता

समाजाचे दुःख वेशीवर टांगतांना शब्दातून
समस्येला चव्हाट्यावर आणते माझी कविता

समाजाच्या दुःखाचे मूळ कारण शोधते
शब्दा शब्दातून व्यक्त होतांना माझी कविता

शब्द शब्दांनी पेटवून समाजात क्रांती घडविते
हाती शब्दांची मशाल घेऊन सदैव कविता

शब्दाशब्दात बारूद भरून अन्यायाविरुद्ध
जन मनात स्फोट घडवित असते कविता

समाजातील दुःख दारिद्र्य दैन्य सदैव शोधते
हाती घेऊन शब्दांची मशाल माझी कविता



**- नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**


प्रवेश सुरू
डी.एम.एल.टी.
P.G.DMLT
फिजोओथेरिपी
डिप्लोमा ऑप्थोमेट्री
OT टेक्नीशियन
X-Ray, ECG
रेडीओलॉजी
संपर्क
9405109103


## चारठाणा जवळ भीषण अपघात; एकाच कुटुंबातील तिघांचा जागीच मृत्यू जखमीवर विवीध दवाखान्यात उपचार





**जिंतूर (बी. डी. रामपूरकर)** : जिंतूर तालुक्यातील चारठाणा जवळील गणेशपुर शिवारात आज सकाळी भीषण अपघात घडून एकाच कुटुंबातील तिघांचा जागीच मृत्यू झाल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. भरधाव वेगात येणाऱ्या ट्रॅव्हल्स आणि डिझायर कार यांच्यात झालेल्या जोरदार धडकेत हा रक्तरंजित अपघात घडला.मिळालेल्या माहितीनुसार, डिझायर कार (क्र. MH 12 GF 6259) हिंगोली जिल्ह्यातील वसमत येथून मंठा दिशेने जात होती. त्याचवेळी समोरून येणाऱ्या ट्रॅव्हल्स (क्र. MH 20 DD 7666) ने कारला जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की कार रस्त्यापासून सुमारे ५० ते ६० फूट दूर फेकली जाऊन तिचा अक्षरशः चकनाचूर झाला.या अपघातात सय्यद अझर सय्यद महेमूद, सुमैया सय्यद अजहर आणि त्यांच्या कुटुंबातील एका लहान बालकाचा जागीच मृत्यू झाला. या तिघांच्या मृत्यूमुळे वसमत परिसरात शोककळा पसरली आहे.दरम्यान, कारमधील मरियम उफाद, फरवा आणि सय्यद इस्माईल हे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर जालना येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत.ट्रॅव्हल्समध्ये एकूण १३ प्रवासी होते. त्यापैकी ४ ते ५ जण जखमी झाले असून त्यांच्यावर मंठा ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू आहेत. ट्रॅव्हल्स चालक संतोष केशवराव शिंदे (वय ४९, रा. संभाजीनगर) हेही गंभीर जखमी झाले असून त्यांना पुढील उपचारासाठी छत्रपती संभाजीनगर येथे हलविण्यात आले आहे.अपघातानंतर स्थानिक नागरिकांनी तत्काळ मदतीसाठी धाव घेतली. वाहनांचे पत्रे कापून जखमींना बाहेर काढण्यात आले. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत वाहतूक सुरळीत केली.या भीषण अपघातामुळे संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त होत असून वेगमर्यादा आणि सुरक्षित वाहनचालना याबाबत पुन्हा एकदा प्रश्न उपस्थित झाले आहेत.बॉक्स आयटम (Highlights) : ■ एकाच कुटुंबातील तिघांचा जागीच मृत्यू ■ कार ५०–६० फूट दूर फेकली गेली ■ ७ ते ८ जण जखमी, विविध रुग्णालयांत उपचार ■ स्थानिक नागरिकांचे तत्पर मदतकार्य ■ पोलिसांकडून पुढील तपास सुरू

## राष्ट्रीय आदिवासी वेशभूषा व नृत्य कला




**खुलताबाद (सनिराम गावंडे)** ता. 22 मार्च रोजी गोंडवाना किंग व गोंडवाना क्वीन राष्ट्रीय राज्यस्तरीय आदिवासी वेशभूषा व नृत्य कला हा कार्यक्रम गोंडवाना सेवा संस्था व एकलव्य संघटनेच्या वतीने कुलस्वामिनी मंगल कार्यालय छत्रपती संभाजीनगर येथे प्रथमच आयोजित केला या कार्यक्रमाच्या स्वागतासाठी कळसुबाई महिला नृत्य पथक चिवळी ता कन्नड या पथकाला आमंत्रित करून प्रमुख पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले. या कार्यक्रमासाठी महाराष्ट्रातून अनेक आदिवासी स्पर्धक सहभागी झाले.ठाकर, भिल्ल,गोंड समाजातील कलाकारांनी आपल्या परंपरा संस्कृती आणि वेगळेपणा जपण्याचा संदेश देत नृत्याला सादरीकरणातून प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. यामध्ये आदिवासी समाज हा भारताचा मूळ रहिवासी जल,जंगल जमिनीचा मालक आहे आदिवासी समाज हा निसर्ग पूजक आहे असे या कार्यक्रमातून त्यांनी दाखवून दिले. कार्यक्रमास आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी चेतना मोरे, नगरसेवक मनोज गांगवे, शिक्षण उपसंचालक गिरीश गावित, विनायक मलावे, एकलव्य संघटनेचे संस्थापक अध्यक्ष पवन राजे सोनवणे, परशु सोनवणे,एकलव्य संघटनेच्या महिला अध्यक्ष पूजा वाघ, विशाल पवार,अखिल भारतीय आदिवासी विकास परिषदेचे अध्यक्ष लकी (भाऊ) जाधव, गौताळा आदिवासी ठाकर समाज बहुउद्देशीय सेवा संस्थेचे अध्यक्ष पांडू कडाळे,राजेंद्र आगिवले आणि महाराष्ट्रात सध्या चर्चेत असलेले आदिवासी कन्या (वाघीण) संगीता कडाळे यांची प्रमुख उपस्थिती राहून महाराष्ट्रातून विविध बोलीभाषा असलेला आदिवासी समाज आपली वेशभूषा नृत्यकला संस्कृती दाखवण्यासाठी आपल्या संघांसोबत उपस्थित होता.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर
साहिल कॉम्प्युटर्स अ‍ॅण्ड प्रिंटर्स
डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.
मो. 8087880274, 8956362639, 9270446603, 9405109103
डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)
■ प्रोजेक्ट रिपोर्ट ■ डेझर्टेशन
■ पीएच.डी./एम.फिल.थेसिस ■ कलर प्रिंट
■ डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट ■ स्कॅनिंग
■ स्पायरल व हार्ड बायडींग ■ लॅमिनेशन
महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर
अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा..
अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ट कामासाठी अवश्यक संपर्क साधा.
Contact No.- 8956362639 / 8087880274
Email - sahilcomputer05@gmail.com

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २५ मार्च २०२६


## एक नेता नव्हे, एक विचार : बाबारावजी नाईक यांची प्रेरणागाथा

आजच्या काळात अनेक आदर्श व्यक्तिमत्त्व विस्मृतीत जात आहेत. परंतु असे एक आदर्श व्यक्तिमत्त्व आहे; ते आजही आजच्या पीढीला प्रेरणा देत आहे आणि देत राहिल ते म्हणजे मा. बाबारावजी नाईक होत. त्यांच्या कार्याचा संक्षिप्त आढावा घेणारा एक लेख...२० मार्च हा दिवस केवळ एका व्यक्तीच्या स्मरणाचा नाही, तर एका विचारपर्वाचा, एका संघर्षमय प्रवासाचा आणि समाजाशी नाळ जपणाऱ्या नेतृत्वाच्या अखंड परंपरेचा स्मृतिदिन आहे. बाबारावजी नाईक हे नाव उच्चारले की परभणीच्या मातीतील जिद्द, शिक्षणाविषयीची तळमळ आणि सामान्य माणसासाठी जगणाऱ्या नेतृत्वाची एक सशक्त प्रतिमा डोळ्यांसमोर उभी राहते. त्यांच्या कार्याचा मागोवा घेताना केवळ एका नेत्याची कहाणी उलगडत नाही, तर एका विचारधारेची घडण आणि समाजपरिवर्तनाची वाटचाल स्पष्ट होत जाते.

भारतीय स्वातंत्र्याचा इतिहास केवळ १५ ऑगस्ट १९४७ या तारखेपुरता सीमित नाही; तो अनेक लढ्यांचा, असंख्य बलिदानांचा आणि विविध प्रांतांच्या सामूहिक स्वप्नांचा परिणाम आहे. मराठवाड्याने निजामशाहीच्या जोखडातून मुक्त होण्यासाठी १७ सप्टेंबर १९४८ पर्यंत झुंज दिली. त्यानंतर भाषावार राज्यांच्या पुनर्रचनेत मराठी अस्मितेचा प्रश्न ऐरणीवर आला. "संयुक्त महाराष्ट्र" चळवळीने जनतेच्या मनात स्वाभिमानाची ठिणगी पेटवली आणि अखेर १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. यशवंतराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली नव्या राज्याने विकासाचा मार्ग धरला.

या नव्या राज्यरचनेत परभणी जिल्हा मात्र वेगळ्या राजकीय प्रवाहाचा साक्षीदार ठरला. काँग्रेसच्या प्रभावी वर्चस्वाच्या काळातही येथे पर्यायी विचारांना पोषक वातावरण होते. अशा पार्श्वभूमीवर १९६२ च्या सार्वत्रिक निवडणुकीत बाबारावजी नाईक यांनी शेतकरी कामगार पक्षाच्या तिकीटावर पाथरी विधानसभा मतदारसंघातून विजय संपादन केला. हा विजय केवळ एका उमेदवाराचा नव्हता; तो जनतेच्या विचारपरिवर्तनाचा आणि स्वाभिमानी राजकारणाच्या स्वीकाराचा होता.

१९६२ ते १९६७ या कालावधीत आमदार म्हणून कार्य करताना त्यांनी सत्तेला सेवा मानले. शेतकरी, कामगार आणि मागास घटक यांना न्याय मिळवून देणे हेच त्यांच्या कार्याचे केंद्र होते. पण त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची खरी उंची त्यांच्या तत्त्वनिष्ठतेतून दिसून येते. बेळगाव सीमावादाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्राच्या अस्मितेसाठी जेव्हा आमदारांनी सामूहिक राजीनामे दिले, तेव्हा त्यांनीही कोणतीही तडजोड न करता आमदारकीचा त्याग केला. सत्तेपेक्षा तत्त्वांना प्राधान्य देणारा हा निर्णय त्यांच्या राजकीय आयुष्याचा तेजस्वी अध्याय ठरतो.

राजकारणाच्या पलीकडे त्यांचे कार्य शिक्षणाच्या क्षेत्रात अधिक व्यापक स्वरूपात उमटते. अण्णासाहेब गव्हाणे यांच्या मार्गदर्शनाखाली परभणीतील महात्मा फुले विद्यालयात मुख्याध्यापक म्हणून काम करताना त्यांनी शिक्षणाला समाजपरिवर्तनाचे प्रभावी साधन बनवले. त्यांच्या दृष्टीने शाळा म्हणजे केवळ शिक्षण देणारी संस्था नव्हती; ती मूल्यांची, विचारांची आणि स्वप्नांची जडणघडण करणारी कार्यशाळा होती. त्यांनी विद्यार्थ्यांना केवळ अक्षरज्ञान दिले नाही, तर आत्मविश्वास, स्वाभिमान आणि सामाजिक जाणिवांची पेरणी केली.

त्यांच्या नेतृत्वगुणांमुळे ते परभणी जिल्हा परिषदेचे सदस्य झाले आणि पुढे सर्वानुमते अध्यक्षपदी विराजमान झाले. सहा वर्षांच्या कार्यकाळात त्यांनी प्रशासन आणि सामान्य जनता यांच्यातील दरी कमी करण्याचा प्रयत्न केला. मात्र त्यांच्या ठाम काँग्रेसविरोधी भूमिकेमुळे आणीबाणीच्या काळात त्यांना अटक झाली आणि नाशिकच्या कारागृहात ठेवण्यात आले. ही अटक त्यांच्या विचारांना दडपण्यासाठी होती; पण उलटपक्षी त्यातून त्यांची निष्ठा अधिक दृढ झाली आणि संघर्षाची धार अधिक तीव्र झाली.

१९६८ साली नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या प्रेरणेतून त्यांनी "नेताजी सुभाष शिक्षण संस्था" स्थापन केली. पाथरी, सेलू आणि मानवत या भागात शिक्षणाची ज्योत प्रज्वलित करत त्यांनी ग्रामीण भागात ज्ञानाची खरी क्रांती घडवून आणली. शिक्षणाची दारे उघडून त्यांनी हजारो कुटुंबांचे आयुष्य बदलले. त्यांच्या या कार्यातून उभे राहिलेले विद्यार्थी आज विविध क्षेत्रांत आपल्या कर्तृत्वाची छाप पाडत आहेत, हीच त्यांच्या कार्याची खरी फलश्रुती आहे.

सामाजिक कार्याच्या क्षेत्रातही त्यांनी अनेक महत्त्वपूर्ण उपक्रम राबवले. शेषरावजी देशमुख यांच्या सहकार्याने परभणी गृहनिर्माण सोसायटीची स्थापना करून त्यांनी सर्वसामान्य माणसाच्या निवाऱ्याचा प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न केला. पाथरी नगरपरिषदेवर मैला वाहणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी काढलेला मोर्चा हा त्यांच्या सामाजिक संवेदनशीलतेचा परिपाक होता. या आंदोलनामुळे डोक्यावरून मैला वाहून नेण्याची अमानवी प्रथा बंद झाली—हा मानवी सन्मानाच्या लढ्याचा निर्णायक विजय होता.

परभणी जिल्ह्यात शेतकरी कामगार पक्षाची भक्कम संघटना उभारण्यात त्यांचा मोठा वाटा होता. त्यांनी केवळ संघटना उभी केली नाही, तर स्वाभिमान, समता आणि शिक्षण या मूल्यांवर आधारित विचारपरंपरा रुजवली. त्यांच्या कार्याचा प्रभाव केवळ त्यांच्या काळापुरता मर्यादित राहिला नाही, तर पुढील पिढ्यांच्या विचारविश्वातही तो ठामपणे रुजला.

आज त्यांच्या स्मृतिदिनी त्यांना अभिवादन करताना एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते—नेतृत्व हे पदांमध्ये मोजले जात नाही, ते उभ्या केलेल्या माणसांत आणि पेटवलेल्या विचारांत मोजले जाते.

आणि या मोजमापात बाबारावजी नाईक हे एक व्यक्तिमत्त्व नसून एक युग आहेत.


**- डॉ. प्रभाकर गायकवाड**
**छत्रपती संभाजीनगर**
93225 56113


## सुशीलकुमार शिंदे यांना डी.लिट. पदवी प्रदान




**पुणे :** ज्येष्ठ नेते सुशीलकुमार शिंदे यांना सिंबायोसिस आंतरराष्ट्रीय विद्यापीठाने 'डॉक्टर ऑफ लेटर्स' (डी.लिट्.) ही प्रतिष्ठित पदवी प्रदान केली. या विशेष दीक्षांत समारंभात बोलताना शिंदे यांनी शिक्षण आणि चिकाटी हे यशाचे मुख्य साधन असल्याचे प्रतिपादन केले. शिक्षण हे माणसाचे आयुष्य बदलू शकणारे सर्वात प्रभावी साधन असून, कोणतेही काम मोठे किंवा लहान नसते, असे मत त्यांनी व्यक्त केले.

हा समारंभ सिंबायोसिस आंतरराष्ट्रीय विद्यापीठाच्या लवळे, पुणे येथील कॅम्पसमध्ये आयोजित करण्यात आला होता. प्रख्यात शास्त्रज्ञ आणि कौन्सिल ऑफ सायंटिफिक अँड इंडस्ट्रियल रिसर्चचे माजी महासंचालक डॉ. रघुनाथ माशेलकर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. सिंबायोसिस आंतरराष्ट्रीय विद्यापीठाचे कुलपती प्रा. डॉ. शां. ब. मुजुमदार यांनी समारंभाचे अध्यक्षस्थान भूषवले.

शिंदे यांनी आपल्या सोलापूर येथील जन्मभूमीपासून सुरू झालेल्या प्रवासाचा उल्लेख केला. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आणि देशाचे गृहमंत्री यांसारख्या महत्त्वाच्या पदापर्यंत पोहोचण्याचा अनुभव त्यांनी उपस्थितांसमोर मांडला. आपल्या सुरुवातीच्या संघर्षांची आठवण करून देत, त्यांनी श्रमाच्या प्रतिष्ठेचे आणि इच्छाशक्तीच्या महत्त्वाचे अधोरेखित केले.

## २४ मार्च जागतिक क्षयरोग दिनराष्ट्रीय क्षयरोग दुरिकरण कार्यक्रम संपन्न



**बीड (भगवंत पाळवदे) :** दि.२४ जागतिक क्षयरोग दिनानिमित्त बीड शहरामध्ये आज सकाळी ८.०० वाजता भव्य अशी क्षयरोग जनजागृती रॅली काढण्यात आली. या रॅलीचे उद्घाटन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रहेमान यांच्या हस्ते करण्यात आले. उद्घाटन प्रसंगी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सतिशकुमार सोळंके, जिल्हा आरोग्य अधिकारी, डॉ. उल्हास गंडाळ, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ संजय कदम, निवासी बाहयरुग्ण वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मीकांत तांदळे, जिल्हा क्षयरोग अधिकारी बीड डॉ. महेशकुमार माने, वैद्यकीय अधिकारी डॉ. मनिषा जाधव जिल्हा क्षयरोग केंद्र बीड, डॉ. रविकांत चौधरी बालरोग तज्ज्ञ, जिल्हा रुग्णालय बीड तसेच जिल्हा क्षयरोग कार्यालय बीड व आरोग्य विभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. या क्षयरोग जनजागृती रॅलीमध्ये शासकीय नर्सींग व खाजगी नर्सींग महाविद्यालयातील विद्यार्थी/विद्यार्थीनी व शिक्षक यांचा सहभाग होता व विविध शैक्षणिक संस्था संस्कार विद्यालय, चंपावती विद्यालय, भगवान विद्यालयाचे विद्यार्थी/विद्यार्थीनी व शिक्षक यांचाही या रॅलीमध्ये सहभाग होता. सदरील रॅली छत्रपती शिवाजी महाराज चौक, बीड येथून सुरु होऊन बशीरगंज, भाजीमंडई, सुभाष रोड, साठेचौक व शेवटी छत्रपती संभाजी महाराज क्रिडांगण बीड येथे समारोप झाला. समारोप प्रसंगी क्षयरोगाचे जनक रॉबर्ट कॉच यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन क्षयरोगबाबतची प्रतिज्ञा घेण्यात आली. तसेच युनिव्हर्सल वेल्फेअर अ‍ॅण्ड सोशल रिफॉर्म फाउंडेशन बीड मार्फत १० क्षयरुग्णांना पोषण आहाराची किट वाटप करण्यात आले. त्यानंतर जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. महेशकुमार माने, वैद्यकीय अधिकारी डॉ. मनिषा जाधव व जिल्हा कार्यक्रम समन्वयक विजय कारगुडे व जिल्हा पीपीएम समन्वयक महेश सुरवसे जिल्हा क्षयरोग केंद्र बीड यांनी क्षयरोग बाबत मार्गदर्शन केले व सर्व शालेय विद्यार्थी/विद्यार्थीनी, शिक्षक, आरोग्य कर्मचारी व अधिकारी यांना अल्पोपहार देऊन समारोप करण्यात आले. २०२६ या वर्षी टीबीचे घोषवाक्य"होय। आपण क्षयरोगाचा अंत (टी.बी.) करु शकतो-नेतृत्वाच्या बळावर व समुदायाच्या सहभागावर , निश्चित संपवू शकतो..." होय! आपण क्षयरोग संपवू शकतो, नेतृत्वाच्या जोरावर, समाजाच्या बळावर. आजच्या धावपळीच्या काळात आरोग्याला समतोल राखणे ही आवश्यक असतानाच अनेक रोगांपैकी एक क्षयरोग जो दिर्घकालीन असून तो फुप्फुसांना मायक्रोबॅक्टेरिअम टयुबरक्युलोसीस या जीवाणुमुळे होतो. रॉबर्ट कॉक यांनी १८८२ साली ट्युबरक्युलोसीस या जीवाणुचा शोध लावला. त्यामुळे २४ मार्च हा जागतीक क्षयरोग दिन म्हणुन साजरा करण्यात येतो. त्याच प्रमाणे क्षयरोग हा मेंदुच्या आवरणाला हाडे आणि सांधे, लसिकाग्रंची त्वचा व शरीरातील इतर अवयवांना देखील होऊ शकतो,फक्त नखे व केस सोडले तर इतर अवयवांना क्षयरोगाची बाधा होऊ शकते. इथे आपण महत्वपूर्ण अशा फुप्फुसांच्या क्षयरोगाबाबत विचार करणार आहोत. हा जागतिक पातळीवर आढळणारा रोग असुन हा आर्थिकदृष्टया मागासलेल्या समाजात जेथे आरोग्यदायी अन्न मिळत नाही अशा ठिकाणी तसेच दाटीवाटी वस्तीच्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात होतो.क्षयरोगाची कारणे व प्रसार जेथे दाटवस्ती आहे, अस्वच्छ वातावरण आहे अशा कोंदट ठिकाणी क्षयरोगाचा प्रसार जास्त प्रमाणात होतो. हा रोग साधारणपणे कुपोषित लोकांना नक्कीच होण्याचा दाट संभव असतो. महत्वाचे म्हणजे जर आपण क्षयरोगी रुग्णाच्या संपर्कात आल्यास त्याच्या खोकल्या/शिंकल्यामुळे पसरणाऱ्या तुषार बिंदुमुळे त्याच्या उघडयावर पडलेल्या थुंकीद्वारे या रोगाचा प्रसार जलदगतीने होतो. अतिमहत्वाचे म्हणजे क्षयरुग्णाने वापरलेले कपडे, वस्तु ईत्यादी निर्जतुकीकरण न करुन घेतल्यास क्षयरोगाची बाधा होण्यास संभव असतो. परंतू गेल्या काही दशकापासुन एचआव्ही संसर्गाचा आगमानामुळे क्षयरोग संसर्ग ही समस्या फार भयानक रुप धारण करु लागली आहे. दर ५ मिनीटाला २ व्यक्तीचा मृत्यु हा क्षयरोगा मुळे होत आहे.लक्षणे१. दोन आठवडे किंवा त्यापेक्षा जास्त दिवस असणारा खोकला.२. सौम्य प्रकारची व सतत येणारा ताप३. रुग्णास अति खोकल्यामुळे छातीत दुखणे.४. वजनात घट होणे. सन २०२५ मध्ये बीड जिल्हयात १९९८ क्षयरुग्णांचे निदान झाले असुन यापैकी एकुण १९९८ क्षयरुग्ण उपचारावर ठेवले होते. त्यापैकी ११८९ क्षयरुग्णांनी पुर्ण उपचार घेऊन बरे झालेले आहेत व उर्वरित क्षयरुग्ण उपचारावर आहेत. प्रधानमंत्री टीबी मुक्त भारत अभियानांतर्गत २४ मार्च २०२६ ते ०१ जुलै २०२६ या कालावधीतील बीड जिल्हयातील अति जोखीमग्रस्त ३४४ गावामध्ये १०० दिवस विशेष मोहिम राबविण्यात येणार आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २५ मार्च २०२६


# बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयात आरोग्य तपासणी शिबिर






**जालना :** बदलत्या जीवनशैलीमुळे आरोग्याचे प्रश्न मोठ्या प्रमाणावर निर्माण होत आहे. व्यक्तीचे नियमित जीवन मोठ्या प्रमाणात बदलून गेले आहे. समाजातील एकूणच सामाजिक गुंतागुंत आणि आरोग्याचे प्रश्न क्लिष्ट झाले आहेत. स्पर्धात्मक वाटचालीत मानसिक स्वास्थ्य आपण हरवून बसलो आहे. प्रत्येक व्यक्तीला काही ना काही तरी आजाराने ग्रासलेले दिसून येते त्यातून तो बाहेर पडण्याचा प्रयत्न करताना दिसून येतो. असे असले तरी परिस्थितीनुसार आपण आपल्या जीवनशैलीत बदल करणे गरजेचे आहे. जीवनशैलीतील बदलामुळे अनेक आजार निर्माण होत आहेत. आपल्या शरीराची मेटॅबोलिक डिसऑर्डर वाढली की, विविध आजार डोके वर काढतात. आरोग्य संपन्न राहण्यासाठी आपण स्वतःकडे अधिकाधिक लक्ष देणे गरजेचे आहे. आपली रोगप्रतिकारक क्षमता वाढली पाहिजे. आपल्या सवयी निकोप आणि शिस्तशीर असल्या पाहिजे. सुदृढ आरोग्याबद्दलची जागृती वाढली पाहिजे. असे प्रतिपादन अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालयाचे डॉ.राजेंद्र गाडेकर यांनी केले. बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयात आज अंतर्गत गुणवत्ता मूल्यमापन कक्षाद्वारे, आरोग्य समिती व जिल्हा सामान्य रुग्णालय जालना यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले यावेळी ते बोलत होते. यावेळी प्रभारी प्राचार्य डॉ. भूषण नाफडे, माजी प्राचार्य डॉ. कविता प्राशर, डॉ. कल्याण कुंभार, जिल्हा सामान्य रुग्णालयाची डॉक्टर्स व नर्स यांची टीम उपस्थित होती. हेल्थ व फिटनेस कोच डॉ. सुरेखा गाडेकर म्हणाल्या की, आरोग्य संपन्न जीवन जगण्यासाठी विविध प्रकारचे व्यायाम, योग, झुंबा, चालणे अशा प्रकारचे वर्कआउट करणे गरजेचे आहे. संतुलित आहाराला आपण महत्व देणे गरजेचे आहे. विविध प्रकारची कडधान्य आणि पालेभाज्या यांचा समावेश आपल्या आहारात असायला हवा. स्वतःला आनंदी बनविण्यासाठी आपला माईंड सेट बदलला पाहिजे. कुटुंबातील प्रेम आणि परस्पर संबंध सुदृढ बनविण्याकडे लक्ष दिले पाहिजे. या शिबिरात उच्च रक्तदाब, रक्तातील साखरेची पातळी, सीबीसी, लिपिड प्रोफाइल, विटामिन बी १२, विटामिन डी ३, एचबीएवनसी अशा विविध प्रकारच्या चाचण्या करण्यात आल्या. याप्रसंगी बारवाले महाविद्यालयातील जैवतंत्रज्ञान विभागाचे माजी विद्यार्थी श्री. अश्विन भास्करराव आंबेकर याची जालना महानगरपालिका स्वीकृत नगरसेवकपदी नियुक्ती झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी आरोग्य समितीचे प्रा. डॉ. पवन देशमुख, प्रा. डॉ. स्वाती पुरी, प्रा. वर्षा वानखेडे यांनी प्रयत्न केले. यावेळी प्रा. संतोष इप्पर, प्रा. राहुल वाकडे, प्रा. शेख आफरीन, श्री. सुरेश खरात, श्री. नरेंद्र देशमुख, श्री. विनोद पवार, श्री. काशिनाथ खलसे यांनी सहकार्य केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सुधीर देशपांडे यांनी केले तर आभार प्रा. डॉ.पवन देशमुख यांनी मानले.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर सर्वपक्षीय आंबेडकरवादी सार्वजनिक जयंती महाउत्सव समितीच्या अध्यक्षपदी दिपकभाऊ निकाळजे यांची निवड



**छत्रपती संभाजीनगर :** दरवर्षीप्रमाणे छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) शहर व जिल्ह्यामध्ये विश्वरत्न परमपुज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची 135 वी आदर्श जयंती महाउत्सव सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमाव्दारे साजरा करण्यासाठी आंबेडकरी चळवळीत निष्ठेने सक्रिय काम करणाऱ्या तसेच वर्षभर प्रस्थापित व्यवस्थेला आव्हान देऊन समाजाच्या न्याय हक्कासाठी - लढणाऱ्या व समाजाला न्याय हक्क मिळवून देणाऱ्या आंबेडकरी चळवळीच्या सर्व स्वाभिमानी जिगरबाज भीमसैनिकांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये सुभेदारी शासकीय विश्रामगृह येथे झालेल्या सर्वपक्षीय आंबेडकरवादी पक्ष संघटनांच्या वतीने सर्वपक्षीय आंबेडकरवादी सार्वजनिक जयंती महाउत्सव समिती-135 सर्वानुमते जाहीर करण्यात आली आहे. समितीची कार्यकारणी जाहीर होताच सर्व नवनिर्वाचित पदाधिकार्यांनी ऐतिहासिक भडकलगेट येथिल प्रशासनाकडुन संथ गतीने सुरु असलेल्या महामानवाच्या स्मारकाच्या कामास भेट दिली व संबंधित अधिकार्यांना धारेवर धरुन जाब विचारला.सर्वानुमते जाहीर करण्यात आलेली जयंती महाउत्सव समितीची कार्यकारिणी पुढील प्रमाणे अध्यक्ष-दिपकभाऊ निकाळजे, उपाध्यक्ष-अरविंद कांबळे,अनिल बिरारे,विशाल इंगळे,मिलींद मोकळे कार्याध्यक्ष-अमित वाहुळ, आनंद कस्तुरे स्वागताध्यक्ष-काकासाहेब काकडे (नगरसेवक) सचिव-सचिन जोगदंड, नागेश केदारे, किशोर खिल्लारे,आनंद बोर्डे, सहसचिव-कपिल बनकर,सोनु नरवडे,नितीन निकाळजे,नितीन सुर्यवंशी, सरचिटणीस-विजय शिंगारे,मुकेश खोतकर, नितीन आदमानेकोषाध्यक्ष-राजकुमार कांबळे,सिद्धार्थ सुर्यवंशी, विकास वाव्हळ, सल्लागार-भंते विशुद्धानंद बोधी महाथेरो,भन्ते नागसेन,भंते संघप्रिय,भंते बोधिधम्मो,प्रकाशदादा निकाळजे,वसंतराज वक्ते,अशोकदादा बोर्डे,मोहनमामा म्हस्के,संतोष चव्हाण,डॉ.दीपक खिल्लारे,सिध्दोधन मोरे,त्रिशरण गायकवाड,विजय बचके,राजु होर्शिळ,विष्णु जगताप,महेंद्र काटेकर,मोतीलाल त्रिभुवन,विलास जगताप,अनिल पांडे,देवानंद वानखेडे,किशोर ससाने,सतिश गायकवाड,चंद्रमुनी काळे,मिलींद बन्सोडे,राजु कांबळे, हेमंत मोरे,दिपक म्हस्के,विजय शिंदे,विष्णु वाघमारे,दादाराव सोनट्के,प्रसिद्धी प्रमुख-परमेश्वर हाडोळतीकर,अनामी मोरे, गौरव मोरे, कुमार वाघमारे सदस्यः- राहुल गवळी,धिरज मोरे, स्वप्निल शिरसाट, कृष्णा शरणागत,विजय पैठणे,नागेश जावळे, दत्ता जाधव,प्रितेश काकडे,योगेश वर्मा,राम पाखरे, संदीप निकाळजे, योगेश सोनवणे,अविनाश डोंगरे,अक्षय जाधव, संदीप जाधव, सतीश सोनवणे, प्रशांत मस्के, आनंद दांडगे, हरिदास वानखेडे, शुभम जमधडे, रोहित परदेशी, नासिर पठाण, नितीन भगत, सचिन मगरे, कुणाल कासार, सर्व सामाजिक चळवळीत काम करणाऱ्या स्वाभिमानी भीमसैनिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## भोंदू अशोक खरात हा सरकार पुरस्कृत बाबा - विजय कुंभार



**मुंबई :** अनेक महिलांचे लैंगिक शोषण करणारा भोंदू अशोक खरात हा सरकार पुरस्कृत बाबा होता की काय? अशी परिस्थिती असल्याची मिश्किल टिप्पणी माहिती अधिकार कार्यकर्ते विजय कुंभार यांनी केली आहे. तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, रुपाली चाकणकर, दीपक केसरकर आदी नेत्यांनी पदावर असताना अशोक खरातची विशेष काळजी घेतली. त्याचे गुण माहिती असूनही त्याचे उदात्तीकरण केले. त्यामुळे भोंदू खरात हा सरकार पुरस्कृत बाबाच वाटतो, असे ते म्हणालेत.

भोंदू अशोक खराताला पोलिसांनी लैंगिक शोषणाच्या आरोपाखाली अटक केली आहे. त्याच्यावर अनेक महिलांचे श्रद्धेच्या नावाखाली लैंगिक शोषण केल्याचा आरोप आहे. राज्यातील अनेक बडे नेते व प्रशासकीय अधिकारी त्याच्या संपर्कात होते. आता प्रहार संघटनेचे नेते बच्चू कडू यांच्यासोबतचा खरातचा एक व्हिडिओही व्हायरल झाला आहे. त्यातच अशोक खरातने एका महिला नेत्याला लोकसभा निवडणुकीचा निकाल धक्कादायकपणे फिरवण्याची ग्वाही दिल्याचीही बाब समोर आली आहे. या पार्श्वभूमीवर विजय कुंभार यांनी या प्रकरणी उपरोक्त टिप्पणी केली आहे.

विजय कुंभार एका पोस्टमध्ये म्हणाले, भोंदूबाबा अशोक खरात हा सरकार पुरस्कृत बाबा होता की काय याची खात्री पटावी अशी परिस्थिती सध्या आहे. तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे खरातने मंदिरासाठी रस्त्याची मागणी केली आणि ती पूर्ण देखील झाली.मंत्रिमंडळ उप समितीने पाणी दिले, महिला आयोगाच्या माजी अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी पदावर असताना आणि त्याचे "गुण" माहीत असूनही त्याचे उदात्तीकरण केलं, त्याची दुष्कृत्ये माहीत असूनही त्याकडे दुर्लक्ष केले,त्याच्याकडे जास्तीत जास्त लोक आकर्षित होतील याची काळजी घेतली.महसूल विभागाने जमीन विषयक कायद्याकडे दुर्लक्ष केले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २५ मार्च २०२६


# बालरंगभूमीच्या चित्रकला स्पर्धेत ५ वी ते ७ वी या गटात शुध्दी जाजू तर इयत्ता ८ वी ते १० वी उम्मे-रोमान शेख यांना सर्वोत्कृष्ट पारितोषिक







**छत्रपती संभाजीनगर :** बालरंगभूमी परिषद छत्रपती संभाजीनगर जिल्हा शाखेच्या वतीने घेण्यात आलेली चित्रकला स्पर्धेत विद्यार्थी यांचा सहभाग दि. ......२०२६ रोजी बालरंग भूमी परिषद मुंबई जिल्हा शाखा छत्रपती संभाजी नगर यांच्यातर्फे चित्रकला स्पर्धा घेण्यात आली होती या स्पर्धेत विविध शाळेतील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला यामध्ये ५ वी ते ७ वी या गटात शुध्दी जाजू तर इयत्ता ८ वी ते १० वी उम्मे-रोमान शेख यांना सर्वोत्कृष्ट पारितोषिक मिळाले.स्पर्धेचा बक्षीस वितरण सोहळा मराठवाडा कामगार ग्रंथालय सिडको या ठिकाणी संपन्न झाला यावेळी डॉ. प्रमोद दुधडे, डॉ. आर. जी. नरवडे, डॉ. ज्योती खंदारे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. बालरंगभूमी परिषदेचे अध्यक्ष आसेफ शेख अन्सारी, उपाध्यक्ष हसन इनामदार, वाल्मीक जाधव, प्रमुख कार्यवाह गोकुळ गायकवाड, कोषाध्यक्ष विनोद आघाव, सह-कार्यवाह अर्चना देवधर, कार्यकारिणी सदस्य रमेश सोळंके, लक्ष्मण अहिरे यांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले यावेळी राहुल रगडे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ॲड. सुशील बनकर, प्रा. श्रीपाद पदे यांनी परिश्रम घेतले.स्पर्धेचा निकालइयत्ता १ ली ते ४ थी गटात प्रमाणपत्र मानकरी ऐश्वर्या गणेश खंबाट राजलक्ष्मी श्रीनिवास केंद्रे आरोही योगेश खनके मधुशा नन्नवरे ५ वी ते ७ वी या गटात सर्वोत्कृष्ट - शुध्दी पवन जाजू उत्कृष्ट - सृष्टी नितीन राडीकर उत्तम - मल्हार अमित गुंडरे प्रशंसनीय - अर्हम आसेफ शेख, पूर्वा पंकज राठोडप्रमाणपत्र मानकरी आरुषी राजेश्वर तांबडेश्रद्धा विनोद खैरे दिव्या अनिल बिडीवाले कु. उर्जिता संजय काटकर आरुष बळीराम साळवे ईश्वरी गोपाल डहाळे- आयुषी सचिन उपाध्ये इयत्ता ८ वी ते १० वी या गटातसर्वोत्कृष्ट : उम्मे रोमान आसेफ शेख उत्कृष्ट : पल्लवी विजय काळुंखे उत्तम : माधुरी लखन ढोकळे प्रशंसनीय : दिक्षा रविंद्र पवार, आदिराज राठोड प्रमाणपत्र मानकरी अंशिका चंदन विश्वकर्मा,अभिनव गोकुळ गायकवाड

# अवकाळीग्रस्त शेतकऱ्यांना तत्काळ मदत पुरवा : विजय वडेट्टीवार



**मुंबई :** राज्यात सध्या कायदा-सुव्यवस्थेचा पुरता बोजवारा उडाला आहे. एकीकडे अल्पवयीन मुलींच्या अपहरणाच्या घटनांनी महाराष्ट्र हादरला आहे. तर दुसरीकडे, मराठवाड्यातील अवकाळी पावसाने शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले असताना सरकार केवळ भोंदू बाबांच्या मागे लागले आहे, अशी टीका विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी आज विधानसभेत सरकारवर निशाणा साधताना केली.

विधानसभेत स्थगन प्रस्ताव मांडत असताना वडेट्टीवार यांनी ब्रह्मपुरीसह राज्यातील सुरक्षिततेच्या प्रश्नावर सरकारला धारेवर धरले. ते म्हणाले, ब्रह्मपुरी शहरात गेल्या काही दिवसांत १० वी आणि १२ वी मध्ये शिकणाऱ्या ६ अल्पवयीन मुली बेपत्ता झाल्याची धक्कादायक घडली आहे. यापैकी केवळ २ मुलींचा तपास लागला असून ४ मुली अजूनही बेपत्ता आहेत. सरकार सीसीटीव्हीसाठी कोट्यवधी रुपये खर्च करते, मग तालुका स्तरावर या व्यवस्था कुठे आहेत? मुलींचे अपहरण होत असताना आणि त्यांचे मोबाईल बंद असताना पोलिस यंत्रणा काय करत आहे? शाळा - महाविद्यालयांमध्ये मुलींच्या सुरक्षिततेबाबत प्रबोधन करण्याची गरज आहे. या प्रकरणी सरकारने बेपत्ता मुलींचा शोध घेण्यासाठी तत्काळ विशेष पथकाची नियुक्ती करावी, अशी मागणी वडेट्टीवार यांनी केली.

विजय वडेट्टीवार यांनी यावेळी राज्यात झालेल्या अवकाळी पावसाचाही मुद्दा मांडला. ते म्हणाले, राज्यात अवकाळी पाऊस आणि गारपीट झाली. मराठवाड्यात झालेल्या अवकाळी पाऊस आणि गारपिटीमुळे हजारो हेक्टरवरील रब्बी पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. नांदेड, हिंगोली, धाराशिव,छत्रपती संभाजीनगर या जिल्ह्यातील स्थिती अत्यंत गंभीर आहे. या नैसर्गिक आपत्तीत ४१ जनावरे दगावली असून २ लोकांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. शेतकरी अडचणीत असताना सरकार केवळ कर्जमाफीच्या पोकळ गप्पा मारत आहे.

अद्याप अनेक ठिकाणी पंचनामेही सुरू झालेले नाहीत. सरकारने तात्काळ निवेदन करून बाधित शेतकऱ्यांना मदत करण्याची मागणी वडेट्टीवार यांनी केली. राज्यात शेतकरी मरत आहे, मुली सुरक्षित नाहीत, पण सरकार मात्र भोंदू बाबांच्या मागे धावण्यात धन्यता मानत आहे. पालकांचा आक्रोश सरकारला ऐकू येत नाही का? असा संतप्त सवाल वडेट्टीवार यांनी उपस्थित केला.

हाफकिन संस्थेतील मौल्यवान त्रिगुणी लसीसाठी वापरण्यात येणारी स्टेन रिलायन्स लाईफ सायन्सेस विकण्याचा घाट घालण्यात येत असल्याचा आरोपही वडेट्टीवार यांनी यावेळी पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशनच्या माध्यमातून केला. ते म्हणाले, हाफकिनकडे असलेला DPT लस तयार करण्याचा स्टेन ही अत्यंत दुर्मिळ आणि ऐतिहासिक जैव - संपत्ती आहे.

# माजी खासदार दत्ता मेघे पंचतत्त्वात विलीन



**वर्धा :** माजी खासदार तथा माजी राज्यमंत्री दत्ताजी मेघे यांच्या पार्थिवावर त्यांच्या जन्मगावी पवनार येथे आज शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस अंत्यविधीला उपस्थित होते. दत्ता मेघे यांच्या पार्थिवावर पुष्पचक्र वाहून मुख्यमंत्री व अन्य मान्यवरांनी श्रद्धांजली अर्पण केली.

यावेळी मुख्यमंत्र्यांसह केंद्रीय परिवहन मंत्री नितीन गडकरी, राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, राज्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ.पंकज भोयर, राज्यमंत्री ॲड.आशिष जयस्वाल, खासदार अमर काळे, आमदार अभिजित वंजारी, आमदार समीर कुणावार, आमदार राजेश बकाने, आमदार चरण ठाकूर, माजी मंत्री रणजित देशमुख, माजी केंद्रीय राज्यमंत्री हंसराज अहीर, विशेष पोलिस महानिरीक्षक संदीप पाटील, माजी राज्यमंत्री राजेंद्र मुळक, जिल्हाधिकारी वान्मथी वान्मथी सी, मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण, जिल्हा पोलिस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल, माजी खासदार रामदास तडस, सुरेश वाघमारे, नगराध्यक्ष सुधीर पांगुळ यांच्यासह माजी खासदार, आमदार व विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २५ मार्च २०२६

# पुतळयांच्या ओझ्याखाली दबलेला महाराष्ट्र - उंचीची शर्यत की विचारांचा पराभव?

महाराष्ट्र हा क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिराव फुले, राजर्षी शाहू महाराज आणि महामानव युगपुरुष डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक न्याय, समता आणि शिक्षणाच्या क्रांतिकारी विचारांनी घडलेला प्रदेश आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्वराज्याच्या संकल्पनेत लोककल्याण केंद्रस्थानी होते, तर महाराजा श्रीमंत यशवंतराव होळकर महाराज यांच्या पराक्रमात स्वाभिमान आणि लोकहिताची जाणीव होती. या सर्वांच्या विचारांनी महाराष्ट्राला एक वैचारिक उंची प्राप्त झालेली आहे. याच विचारधारेवर महाराष्ट्र दिमाखाने उभा आहे.याच विचाराच्या वारशाने महाराष्ट्राची वैचारिक उंची वाढलेली आहे. परंतु आज गावोगावी गल्ली गल्लीत , शहराच्या चौका-चौकात आपापल्या जातींनी वाटून घेतलेल्या आपल्याच महापुरुषांचा पुतळा व पुतळयांच्या उंचीच्या स्पर्धा होत असताना दिसत आहे. विकास, उद्योग, शिक्षण, शेती, रोजगार यांवर चर्चा व्हावी अशी अपेक्षा असताना, स्पर्धा मात्र पुतळयांच्या उभारणीची सुरू झालेली दिसते. जिथे पाण्याची टाकी उभी राहायला हवी होती, तिथे संगमरवरी चौथरा दिसतो; जिथे मुलांना खेळण्यासाठी मैदान हवे होते, तिथे लोखंडी ग्रील आणि सजावटीचे दिवे उभे राहतात. जणू विकासाची व्याख्या बदलली आहे. नक्कीच महापुरुषांविषयी आदर असणे आवश्यक आहे. त्यांच्या स्मृती जपल्या पाहिजेत. त्यांच्या विचारधारा आत्मसात करायला हवे. स्मृती जपण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे त्यांच्या विचारांची अंमलबजावणी. क्रांतिसूर्य महात्मा फुले यांच्या शिक्षणाच्या विचारांवर शाळा उभ्या राहिल्या पाहिजेत. राजर्षी शाहू महाराजांच्या सामाजिक समतेच्या तत्त्वांवर योजना राबल्या पाहिजेत महामानव युगपुरुष डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधानिक मूल्यांवर समाज उभा राहिला पाहिजे छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्य संकल्पनेप्रमाणे लोकहिताचे प्रशासन उभे राहिले पाहिजे.म्हणूनच आज गरज आहे ती पुतळयांच्या स्पर्धेऐवजी विचारांच्या स्पर्धेची. कोणते गाव विकासाच्या वाटेवर आहे? कोणता तालुका अधिक रोजगारनिर्मिती करतो? कोणते शहर अधिक पर्यावरणपूरक आहे? राज्याची ध्येय धोरणे खरच कल्याणकारी आहे का ? अशी स्पर्धा व्हायला हवी.मात्र आज गावोगावी तरुणांची “आपला” महापुरुष आणि “आपला” पुतळा अशी संकुचित मानसिकता तयार होताना दिसते. प्रत्येक समाजघटकाने एखाद्या महान व्यक्तिमत्त्वाला आपला प्रतिनिधी मानले आहे हे स्वाभाविक आहे. पण जेव्हा या महापुरुषाचे रूपांतर जातीय,धार्मिक अस्मितेच्या स्पर्धेत होते तेव्हा प्रश्न अधिक गुंतागुंतीचा बनतो. आज परिस्थिती अशी झाली आहे की अचानक एका रात्रीत पुतळा उभा राहतो. दुसऱ्या दिवशी पहाटे-पहाटे पुतळा दिसला की त्याला जातीचा रंग जो तो आपल्या कुवतीप्रमाणे द्यायला सुरुवात करतो . सदरचा पुतळा अमुक जातीनेच बसवला असा दुराग्रह अन्य गट करतात यातून दुसऱ्या गटात अस्वस्थता येते. मग आपला आणि त्यांचा असा मानसकरून यात आपले काय अस स्वतला विचारत “आपला पुतळा कुठे?” हा प्रश्न विचारला जातो. मग स्पर्धा सुरू होते आपलाही पुतळा असायला हवा म्हणून. या विचारापासून उंची किती? जागा किती मोठी? मिरवणूक कशी? कोठून कोठे? याचे आडाखे बांधले जातात ,त्याची अंमलबजावणी केली जाते. आपला महापुरुष कॉंक्रीटमध्ये, ब्राँझमध्ये उभा करणे म्हणजे आदर व्यक्त करणे हे मान्यच. परंतु जेव्हा कायदेशीर प्रक्रिया, प्रशासनाची परवानगी, सामाजिक समन्वय या बाबी जेव्हा विचारात घेतल्या जात नाही, पुतळे उभे करण्यासाठी उत्साहाच्या हिंदोळ्यावर स्वार झालेल्या तरुणांना या कायदेशीर प्रक्रिया जाचक वाटतात तेंव्हा अनेक ठिकाणी रात्रभरात क्रेन उभी राहते आणि पहाटेपर्यंत पुतळा सज्ज होतो. सकाळी फुलांचे हार, डी.जे., घोषणा, सोशल मीडियावर थेट प्रक्षेपण गुलालाच्या पोतीच्या पोती उधळण होते. या सगळ्या उत्साहाच्या भरात आपण संविधान विरोधी वागत आहोत याचे भान त्यांना राहत नसते. सध्या परिस्थिती गावात, शहरात एखाद्या महापुरुषाचा पुतळा उभा राहिला, तर दुसऱ्या गटाकडून “एक इंच” का असेना मोठा पुतळा उभारण्याची मागणी होते. जणू इतिहासाची उंची इंचांवर ठरते असे त्यांचे पुतळा केला म्हणून ऊर फुगलेल्या लोकांना वाटत असते. हा पुतळा उभे करणे म्हणजे प्रतिष्ठेचा प्रश्न, जातीय अस्मितेचा प्रश्न, स्पर्धेची भावना अधिक बळावतजाते. या सगळ्यांतून पुतळा एक प्रतीक न राहता संघर्षाचे कारण बनतो. यातून कार्य, विचार, समाजकारण बाजूला पडते आणि उरते ती केवळ उंचीची शर्यत. अनेक वेळा हे पुतळे रात्रीतून कायदेशीर परवानगीशिवाय उभे राहतात. सकाळी प्रशासनासमोर यांच्या समोर हतबल होते. प्रशासनाने कायदा सांगणे म्हणजे सदर महापुरुष विरोधी समजले जाते. अधिकारी प्रश्न विचारतात तर त्यांच्यावर महापुरुषांचा अपमान केल्याचा आरोप होतो. कायद्याचे राज्य भावना आणि दबावाखाली कोसळते. त्यामुळे प्रशासनास “झाले ते झाले” अशी भूमिका घ्यावी लागते. लोकशाहीत नियम सर्वांसाठी समान असतात पण पुतळयांच्या बाबतीत नियमांनाही भावनांची माळ घातली जाते. आज गावा गावात,शहरा -शहरात कितीतरी पुतळे बेकायदेशीरपणे पुतळे अतिक्रमणे उभी केली आहेत. हे सगळे प्रशासनाला माहिती नाही असे नक्कीच नाही. पण प्रशासन हतबल आहे. कालपर्यंत ज्या गावात शाळेची इमारत अपुरी होती, दवाखान्यात डॉक्टर नव्हता, रस्त्यांवर खड्डे होते, तिथे अचानक पुतळा उभा राहतो. प्रश्न असा पडतो की आपल्या प्राधान्यक्रमात काय पुढे आहे? गावात गल्ली -गल्लीत तर शहरात चौका-चौकात एखादा पुतळा किंवा अगोदर असलेल्या महापुरुषापेक्षा एक इंच का असेना पण जास्त उंचीचा पुतळा ! जास्त उंची म्हणजे जास्त प्रतिष्ठा, असा भाबडा पण धोकादायक समज तयार झाला आहे. या स्पर्धेत विवेक हरवतो, संवाद हरवतो, आणि उरते ती केवळ आक्रमक घोषणांची धुरळलेली हवा. गावागावात सुरू असलेले हे “पुतळा युद्ध” अनेकदा छुप्या जातीय स्पर्धांना खतपाणी घालते. समाज एकत्र येण्याऐवजी विभागला जातो. महापुरुषांचे नाव घेऊन मन दुभंगेल अशा भिंती उभ्या होत आहे. खरा आदर म्हणजे त्यांच्या विचारांची अंमलबजावणी. जर एखाद्या महापुरुषाच्या नावाने ग्रंथालय उभे राहिले, अभ्यासिका सुरू झाली, शिष्यवृत्ती दिली गेली, रुग्णालयात सुविधा वाढल्या तर तो पुतळ्यापेक्षा मोठा स्मारक ठरेल. कारण कॉंक्रीटचा पुतळा शांत उभा राहतो पण विचारांचे स्मारक समाजात बदल घडवतो.म्हणूनच आज गरज आहे ती इंचाच्या उंचीची नव्हे, तर विचारांच्या उंचीची. अन्यथा आपण पुतळे उभे करून इंच इंच वाढवत जाऊ. पण समाजाच्या ऐक्याची उंची मात्र नकळत कमी होत जाईल. ज्या भूमीत शिस्त, जबाबदारी आणि लोककल्याण संविधान हे शब्द इतिहासात कोरले गेले, त्याच भूमीत आज प्रतीकांची उंची वाढवून जात,धर्माच्या कोशात राहून आपण समाधान करून घेत आहोत. प्रत्येक तालुक्यात, प्रत्येक वस्तीत पुतळे उभे राहत आहे. पण त्यांच्या विचारांचा काय? पण त्यांचे विचार किती जणांच्या कृतीत उतरते? त्यांच्या नावाने राजकारण करणे सोपे आहे; त्यांच्या तत्त्वांवर समाज उभा करणे कठीण आहे. म्हणून आपण कठीण मार्ग टाळतो आणि सोपा मार्ग निवडतो पुतळा उभारतो, उद्घाटन करतो, भाषणे देतो, फोटो काढतो आणि पुढच्या निवडणुकीची गणिते मांडतो.पुतळा उभा करणे म्हणजे त्यांचे विचार आत्मसात करणे असे नक्कीच नाही. या शर्यतीचा आर्थिक चेहराही कमी भयंकर नाही. एखादा मध्यम आकाराचा ब्राँझ पुतळा, त्याची उभारणी, परिसर सुशोभीकरण, उद्घाटन समारंभ हे सगळे मिळून सहज पंधरा ते पंचवीस लाखांच्या घरात जातं. महाराष्ट्रात जर अशा हजारो पुतळयांची उभारणी झाली असेल, तर हा खर्च हजारो कोटींमध्ये पोहोचणं आश्चर्यकारक नाही. हा पैसा कोठून येतो? स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निधीतून, देणग्यांमधून, राजकीय पाठबळातून पण शेवटी तो सार्वजनिक संसाधनांचा भाग असतो. आज महाराष्ट्रात १० हजार लोकसंख्येमागे एक पुतळा असे समीकरण असावे इतके पुतळे उभे राहत आहेत. ही गती अशीच राहिली, तर १०० लोकांमागे एक पुतळा होणेही दूर नाही.कल्पना करा पाच ते दहा हजार कोटी रुपये जर केवळ पुतळयांवर खर्च झाले असतील, तर ही रक्कम किती मोठी आहे? देशातील काही लहान राज्यांचे वार्षिक अर्थसंकल्प दहा-पंधरा हजार कोटींच्या घरात असतात. म्हणजे एका राज्यात केवळ स्मारकांवर झालेला खर्च हा एखाद्या छोट्या राज्याच्या संपूर्ण वर्षभराच्या प्रशासन, शिक्षण, आरोग्य, पायाभूत सुविधा यासाठीच्या बजेटच्या मोठ्या भागाइतका ठरतो. महाराष्ट्र हा प्रगत, औद्योगिक, आर्थिकदृष्ट्या सक्षम राज्य म्हणून ओळखला जातो. राज्याचा एकूण अर्थसंकल्प लाखो कोटींच्या घरात आहे. म्हणूनच प्रत्येक कोटीचा वापर विचारपूर्वक व्हायला हवा. गावात अजूनही पिण्याच्या पाण्याची समस्या आहे, शाळांमध्ये शिक्षकांची कमतरता आहे, सरकारी रुग्णालयांत साधनसामग्री अपुरी आहे. तरुणांना रोजगार नाही, शेतकरी कर्जात बुडाले आहेत.आलुतेदार,बलुतेदार देशोधडीला लागले आहे. अशा वेळी पुतळयांवर कोट्यवधी रुपये खर्च करणं कितपत व्यवहार्य आहे. हा केवळ भावनिक निर्णय आहे का, की तो राजकीय सोयीचा पर्याय आहे?याचा पण विचार व्हयला हवा. पुतळा उभा करणं सोपं आहे. भूमिपूजन, उद्घाटन, फीत कापणे, भाषणं सगळं एका कार्यक्रमात उरकता येतं. पण एखाद्या शाळेचा दर्जा उंचावणं, आरोग्य व्यवस्था सुधारणं, शेतीसाठी पाणीपुरवठा सक्षम करणं ही दीर्घकालीन, कष्टसाध्य कामं आहेत. त्यामुळे प्रतीकांवर भर देणं अधिक सोपं वाटतं. लोकांच्या भावना तात्काळ पेटवता येतात, कौतुकाची दाद मिळते, राजकीय उपस्थिती दृश्यमान होते.पुतळयांवरून वाद होतात. जागेवरून तणाव निर्माण होतो. एखाद्या पुतळयाची विटंबना झाली जाणीवपूर्वक किंवा चुकून की वातावरण तापतं. बंद, मोर्चे, घोषणाबाजी आणि पुन्हा एक नवा पुतळा. सोशल मीडियावर अफवा पसरतात. समाजगट आमनेसामने उभे ठाकतात. काही तासांत शांत गाव पेटतं. हा चक्रव्यूह समाजाला अधिक अस्थिर करतो. पुतळा स्मरणाचं प्रतीक असतो; पण तो मतभेदांचं केंद्रबिंदू बनला, तर त्यामागचा हेतू हरवतो.महापुरुषांची प्रतिष्ठा पुतळयांच्या संख्येवर ठरते का? त्यांच्या नावाने किती चौक आहेत यावर महानता अवलंबून असते का? एखाद्या विचारवंताने शिक्षणासाठी आयुष्य झिजवलं असेल, तर त्याच्या नावाने वाचनालय उभं राहणं अधिक सुसंगत नाही का? एखाद्या समाजसुधारकाने समतेसाठी लढा दिला असेल, तर त्याच्या स्मरणार्थ समता अभियान, शिष्यवृत्ती योजना, प्रशिक्षण केंद्र उभारणं अधिक अर्थपूर्ण नाही का?जागेचाही प्रश्न महत्त्वाचा आहे. पाच गुंठे जमीन म्हणजे गावासाठी मौल्यवान संपत्ती. त्या जागेत अंगणवाडी, व्यायामशाळा, सामुदायिक सभागृह उभं राहू शकतं. पण ती कायमस्वरूपी स्मारकासाठी राखीव होते. शहरात चौकांमध्ये उभे राहणारे पुतळे वाहतुकीच्या दृष्टीने अडथळा निर्माण करतात. नगररचना ही नियोजनावर चालते भावना तिचं स्थान घेतात तेव्हा विसंगती निर्माण होते.या सगळ्याच्या पाठीमागे एक मानसिकता दिसते “आपला महापुरुष मोठा आहे, म्हणून त्याचा पुतळा मोठा हवा.” ही भावना अभिमानाची असली तरी ती स्पर्धेत बदलली की विभागणी निर्माण करते. महापुरुषांचे विचार समाजाला एकत्र आणण्यासाठी होते पण त्यांच्या पुतळयांवरून समाजात नवे गट निर्माण होत असतील, तर आपण मूळ ध्येयापासून दूर जातो.या प्रक्रियेत सर्वात जास्त नुकसान होते ते तरुण पिढीचे. त्यांना विचारांची ओळख करून देण्याऐवजी आपण त्यांना प्रतीकांची पूजा शिकवतो. प्रश्न विचारण्याची सवय कमी होते. विवेक मागे पडतो. “कोणी काही सूचना दिल्या तर तो विरोधक” अशी मानसिकता तयार होते. लोकशाहीचा आत्मा म्हणजे प्रश्न विचारणे, चर्चा करणे, मतभेद मान्य करणे. पण पुतळयांच्या राजकारणात मतभेदांना जागा नसते; तिथे केवळ घोषणा आणि आरोप असतात.पुतळे उभे राहू नयेत, असा अतिरेकी निष्कर्ष योग्य नाही. स्मरण आवश्यक आहे. पण स्मरणासोबत विवेक हवा. सर्व महापुरुषांचे पुतळे एकाच ठिकाणी, एकाच शहरात, एकाच आकाराची, एकाच उंचीची असावीत कारण आकार आणि उंचीने महानता सिद्ध होत नाही. तसेच पुतळे अधिक म्हणजे कार्य अधिक असेही नाही. सर्वांत महत्त्वाचं प्राधान्यक्रम स्पष्ट हवा. विकासाच्या मूलभूत गरजा पूर्ण केल्यानंतर स्मारकं उभी राहिली, तर त्यात गैर नाही. पण विकासाआधी प्रतीकांना प्राधान्य दिलं, तर प्रश्न विचारले जातीलच.महाराष्ट्र हा विचारांचा, सुधारकांचा, क्रांतिकारकांचा प्रदेश आहे. इथे महापुरुषांनी समाजाला प्रश्न विचारायला शिकवलं. आज त्यांच्याच नावाने उभ्या राहणाऱ्या पुतळयांकडे पाहताना आपण स्वत:लाच विचारलं पाहिजे आपण त्यांच्या विचारांच्या उंचीपर्यंत पोहोचतो आहोत का, की फक्त त्यांच्या पुतळयांची उंची वाढवतो आहोत?इतिहास कॉंक्रीटमध्ये नव्हे, तर कृतीत जिवंत राहतो. पुतळे काळानुसार झिजतात, रंग उडतो, धातू गंजतो. पण विचार जिवंत राहिले, तर समाज पुढे जातो. महाराष्ट्राने ठरवायचं आहे आपण पुतळयांच्या सावलीत उभं राहणार आहोत, की विचारांच्या प्रकाशात चालणार आहोत?नाहीतर उद्या प्रत्येक चौकात पुतळे असतील पण त्या चौकातून जाणाऱ्या लोकांच्या मनात संशय, राग आणि अविश्वास असेल. कॉंक्रीटच्या मूर्ती उभ्या राहतील; पण जिवंत समाज तुटत जाईल. इतिहास विचारेल तुम्ही महापुरुषांच्या नावाने किती उंच पुतळे उभारले, हे सांगू शकाल पण त्यांच्या विचारांची उंची किती वाढवली, हे सांगू शकाल का?निर्णय आपल्या हातात आहे. महाराष्ट्राची खरी ओळख कॉंक्रीटच्या उंचीने ठरणार नाही ती ठरेल समाजातील समतेने, न्यायाने आणि विकासाने. पुतळे उभे राहू द्या पण त्याहून आधी आणि त्याहून उंच विचार उभे राहू द्या. अन्यथा ही उंचीची शर्यत एक दिवस महाराष्ट्रालाच खोल दरीत ढकलून देईल. महाराष्ट्राची खरी उंची संगमरवरी पुतळयांत नसून विचारांच्या उंचीमध्ये आहे. विकास म्हणजे शिक्षणाची गुणवत्ता, आरोग्य सुविधा, उद्योगांची निर्मिती, रोजगाराच्या संधी आणि सामाजिक सलोखा. जर आपण ही दिशा विसरलो, तर पुतळयांची उंची वाढेल; पण समाजाची उंची मात्र कमी होईल.- **प्रा. अभय जायभाये ९९२३५७५५०१**